दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ गुरुवार, ०४ जून २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : ४८ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## मालाडमध्ये जागतिक दर्जाचे ‘मीडिया हब’ उभारण्यासाठी कंपनी स्थापन करण्यात येणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** मालाड येथील आकाशवाणी (प्रसार भारती) च्या जागेवर जागतिक दर्जाचा ‘एकात्मिक चित्रपट आणि दूरदर्शन मीडिया हब’ उभारण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि प्रसार भारती यानी संयुक्तपणे विशेष उद्देश कंपनी (एसपीव्ही) स्थापन करण्यास आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली.

प्रसारभारतीसमवेतझालेल्या सामंजस्य करारासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री ॲड.आशिष शेलार, प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, सध्या या जागेवर एनडीझेड आणि सीआरझेडचे नियम लागू असल्याने केवळ मर्यादित क्षेत्रावर विकास शक्य आहे. संपूर्ण विकास करण्यासाठी आवश्यक वैधानिक परवानग्या, नियमांमधील बदल आणि विकास नियंत्रण नियमावलीतील सुधारणा कराव्या लागणार आहेत. यासंदर्भात राज्य शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य उपलब्ध करून दिले जाईल.



या संयुक्त विकासासाठी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्याकरिता प्रकल्पाचा पूर्व-व्यवहार्यता अभ्यास आणि कृती आराखडा तयार करण्यासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करून डीपीआर आणि तांत्रिक बाबींना गती देण्यासाठी दोन्ही संस्थांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त कार्यसमिती स्थापन करावी. तसेच जून महिन्याच्या अखेरपर्यंत प्रकल्पातील सर्व घटक आणि विकास आराखडा अंतिम करण्याचेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

मालाड येथील प्रसार भारतीच्या एकूण 278 एकर जागेपैकी सुमारे 150 एकर क्षेत्रावर चित्रपट नगरीसोबत संयुक्त विकास प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी प्रसार भारती, एमआयडीसी आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला होता. आकाशवाणीचे बहुतांश प्रसारण एफएम प्रणालीवर स्थलांतरित होत असल्याने उपलब्ध जागेचा प्रभावी वापर मीडिया व मनोरंजन क्षेत्राच्या विस्तारासाठी करण्यात येणार आहे.

या प्रस्तावित मीडिया हबमध्ये अत्याधुनिक चित्रपट स्टुडिओ, साऊंड स्टेजेस, हॉस्पिटॅलिटी, आयटी व आयटीईएस क्षेत्राशी संबंधित सुविधा, पर्यटन विकास प्रकल्प; तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाची फिल्म आणि संगीत प्रशिक्षण केंद्रे उभारण्यात येणार आहेत. यासाठी परदेशातील नामांकित शैक्षणिक संस्थांशी सहकार्य करण्यात येणार आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने लेखक अनिल भगवान चव्हाण( ABC )सन्मानित

**चिखली : प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** चिखली येथील प्रसिद्ध लेखक, कवी, शिक्षक अनिल भगवान चव्हाण (ABC ) यांना नुकतेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले नाशिक येथील ज्ञानदिप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने दि. 23 मे रोजी नाशिक येथील समुद्रा लॉन्स याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू मा. आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते हा पुरस्कार लेखक अनिल चव्हाण यांना प्रदान करण्यात आला.. येवता सारख्या छोट्या गावातून सातत्याने लिखाण करणाऱ्या अनिल चव्हाण यांची आतापर्यंत चार पुस्तकं प्रकाशित झाली आहे, नुकताच त्यांचा शोध सुखाचा हा त्यांचा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे..



अतिशय गरीब परिस्थितीतून आलेले अनिल चव्हाण गेल्या अनेक वर्षांपासून लिखाणाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करीत आहेत त्यांच्या ह्या कार्याची दखल घेवून त्यांना हा पुरस्कार मा. आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला हे क्षण खूप आनंददायी आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच माझ्या जीवनाच सोनं झालं आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्याच नावाने आयुष्यातला पहिला पुरस्कार मिळाला हे क्षण आनंददायी आणि अविस्मरणीय आहेत अश्या भावना अनिल चव्हाण यांनी व्यक्त केल्या.. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होतं आहे...”

## महान–ते–पिंजर रस्त्यावर सुकलेले झाड धोक्याचे, वीज तारांच्या सान्निध्यात ; प्रवाशांच्या जीवाला धोका

**प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही :** महान ते पिंजर या वर्दळीच्या रस्त्यावर रस्त्यालगत उभे असलेले पूर्णपणे सुकलेले झाड धोकादायक अवस्थेत असून ते कधीही कोसळून मोठा अपघात घडण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे या झाडाच्या फांद्या विजेच्या तारांना लागून आहेत.

रस्त्यालगतचे पूर्णपणे वाळलेले झाड. फांद्या विजेच्या तारांपर्यंत पोहोचल्या असून रस्त्यावर झुकल्या आहेत. दुचाकीस्वार प्रवासी वाहन चालक जीव मुठीत घेऊन प्रवास करतात

प्रत्यक्ष पाहणीत हे झाड पूर्णपणे निर्जीव झाले असून त्याच्या फांद्या रस्त्यावर झुकल्या आहेत. याच फांद्या वरून जाणाऱ्या



**सुकलेल्या झाडामुळे प्रवासी व वाहन चालकांच्या जीवाला धोका**

उच्चदाब विजेच्या तारांना टेकल्या आहेत. वादळी वारा किंवा पावसात झाड कोसळल्यास तारा तुटून विद्युत अपघातासह रस्त्यावरील वाहनांवर पडून जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. या मार्गावरून शाळकरी मुले, शेतकरी, दुचाकी व प्रवासी चारचाकी वाहनांची मोठी वर्दळ असते.

“रोज भीती वाटते. झाड एवढं वाकलंय की डोक्यावर पडेल असं वाटतं. वर तार पण आहे. प्रशासन झोपलंय का?” असा संताप महान परिसरातील ग्रामीण भागातील प्रवासी शाळकरी मुले वाहनचालक यांनी व्यक्त केला.

पावसाळ्यापूर्वी धोकादायक झाडे काढण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांचे असतानाही सार्वजनिक बांधकाम विभाग व महावितरणने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

## प्रलंबित पिक विम्याच्या वाटपाच्या मागणीसाठी शिवसेना ( ठाकरे ) पक्षाच्या वतीने नांदेडच्या पिकविमा कंपनीला ठोकले कुलूप

**देगलूर तालुका प्रतिनिधी/ संघपाल मदने :** देगलूर - नांदेड नविन मोंढा येथील AIC भारतीय कृषी वीणा कंपनी agriculture insurance company of India LED या कंपनीच्या ऑफीसला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शेतकरी बांधवांना त्वरित उर्वरित मंडळातील गावांना पिकविमा वाटप करण्यात यावे अशी मागणी करीत व अद्याप पर्यंत पिकविमा वाटप न केल्याच्या निषेधार्थ घोषणाबाजी करुन कुलूप लावून शटर बंद करण्यात आले यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर, शिवसेना देगलूर शहर प्रमुख भगवान जाधव, युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर सचिन इबितवार तमलूरकर, अर्जून लुटे अल्लापुरकर आदी उपस्थितीत होते. या बाबतीत अधिक माहिती अशी की या वर्षी अग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी भारत लिमिटेड या पिक विमा कंपनीला देण्यात आले शासनाने व विमा कंपनीने या वर्षी ओला दुष्काळ पडून खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात ११० टक्के नुकसान झाले असल्याने प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत २०२५-



२०२६ वर्षा करीता नांदेड जिल्ह्यातील सोयाबीन साठी ८८४.७२ कोटी रुपये तर युग, उडीद, तुर व खरीप हंगामातील ज्वारीसाठी ०३.९५ कोटी असा एकूण ८८८.६७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले या पैकी ५०२ कोटी रुपये वाटप करण्यात आले देगलूर तालुक्यातील सात मंडळापैकी पाच मंडळात पीक विमा वाटप करण्यात आले.पण सध्या खरीप हंगामातील खते , बियाणे, किटकनाशके डिझेल, आदी तात्काळ खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे मागील पाच वर्षा पासून सतत ओला दुष्काळ पडल्याने शेतकरी राजा कंगाल व कर्ज बाजारी झाला आहे खते बियाणे खरेदी करण्यासाठी पैसे जवळ नाहीस कोणी उधारी उसनवारी साठी जवळपासही येऊ देत नाहीत अशातच शासनाने खते व बियाणे चे भाववाढ केल्याने शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली आहे ज्यावर शेतकऱ्यांना अशातच शेतकऱ्यांची खते बियाणे खरेदी करण्यासाठी ज्याच्यावर दारोमदार अवलंबून आहे असा हक्काचा पिक विमा देगलूर, खानापूर, मरखेल आदी मंडळातील गावांतील शेतकरी बांधवांना राज्य शासनाकडून ३८५-११ कोटी निधी विमा कंपनीनीला प्राप्त न झाल्याचे कारण दाखवून अद्याप पर्यंत पिकविमा वाटप करण्यात आले नसल्याने पावसाळा जवळ आल्याने शेतकऱ्यांना महागामोलाची बियाणे खरेदी करण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे तीव्र नाराजी पसरली असून त्वरित पीकविमा वाटप करण्यात यावे अशी शेतकरी बांधवांची रास्त मागणी आहे पिक विमा वाटप करण्यात यावे म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उपजिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयासमोरील तीव्र निदर्शने, घोषणाबाजी करण्यात आली पण पिक विमा वाटप न झाल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी नांदेड येथील नवा मोंठा परीसरातील अग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी भारत लिमिटेड या कंपनीचे कार्यालय गाठून पिक विमा अद्याप पर्यंत का वाटप करण्यात आले नाही याचा जाब विचारण्यात आला राज्य शासनाकडून निधी उपलब्ध होताच पिक विमा वाटप करु अशी उडवाउडवीची उत्तरे उपस्थितीत अधिकाऱ्यांनी दिल्याने शिवसेना पदाधिकारी यांचे समाधान झाले नसल्याने पिक विमा तात्काळ वाटप करण्यात यावे, राज्य शासनाकडून पिक विमा कंपनीला अनुदानाची रक्कम त्वरित देण्यात यावे, अशी मागणी व घोषणाबाजी करीत व पिक विमा अद्याप वाटप न केल्याच्या निषेधार्थ पिक विमा कंपनीला शटर बंद करुन कुलूप (ताळे) लावण्यात आले यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर शिवसेना देगलूर शहर प्रमुख भगवान जाधव, युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर सचिन इबितवार तमलूरकर, अर्जून लुटे अल्लापुरकर आदी उपस्थितीत होते.

## शांती नगर झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करा - महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे



**नाशिक (प्रतिनिधी) गोकुळ लोखंडे :** भिमटोला सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे यांच्या नेतृत्वाखाली नाशिक विभागाचे अप्पर आयुक्त श्री.अरविंद लोखंडे यांची भेट घेऊन निवेदन दिले..

निवेदनाचा आशय असा आहे की 2 जून 2026 मंगळवार रोजी अंबड औद्योगिक वसाहती लगत असलेल्या शांतीनगर झोपडपट्टी वसाहतीतील शंभर ते दीडशे हून अधिक पत्र्याची तसेच काही पक्की घरे हटविण्यात आली या कारवाईमुळे अनेक वर्षापासून येथे वास्तव्यास असलेल्या शेकडो कुटुंबावर उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे एमआयडीसी प्रशासनाने कारवाईपूर्वी कोणतीही लेखी नोटीस किंवा तोंडी सूचना दिली नव्हती या वस्तीत अत्यंत गरीब रोजंदारी आणि मजुरी करून पोट भरणारी कुटुंबे राहतात प्रशासनाच्या या घाईघाईच्या कारवाई अनेकांचे संसार थेट रस्त्यावर आले आहेत या कारवाईचे भिमटोला सामाजिक संघटने कडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत असून झोपडपट्टी धारकांचे उघड्यावरील नागरिकांचे राज्य सरकारने त्वरित पुनर्वसन करावे अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल याची नोंद घ्यावी..

याप्रसंगी भिमटोला सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे, नाशिक शहराध्यक्ष मुकुंदराव काळे, कवी व ज्येष्ठ साहित्यिक रत्नदीप जाधव, युवा नेते राहुल आप्पा बागुल, आंबेडकरी चळवळीतील युवा नेते राहुल जाधव, कुणाल शर्मा, प्रशांत गांगुर्डे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते..!

## संपादकीय

### मूल्य नाही; मान तरी!

अवघ्या पाच महिन्यांनी, ८ नोव्हेंबर २०२६ या दिवशी अर्थक्रांतीच्या शालेय बुद्धिमत्तेचे दर्शन घडवणाऱ्या निश्चलनीकरणाचा दशकपूर्ती दिन. एरवी उत्सवांसाठी असे काही 'दिन' शोधत असणाऱ्या सत्ताधाऱ्यांकडून हा दशकपूर्ती सोहळा साजरा केला जाईल किंवा कसे याचे औत्सुक्य समस्त विकासेच्छू भारतीयांस निश्चितच असेल. कारण दहा वर्षांपूर्वी २०१६ साली या दिवशी साक्षात पंतप्रधानांनी 'सव्वासो क्रोर' देशवासीयांसमोर काळ्या पैशाच्या निर्मूलनार्थ पाचशे आणि हजार रुपयांच्या नोटा यापुढे 'कागज के टुकडे' होणार असल्याचे शुभवर्तमान सुहास्यवदने सादर केले.

नंतर काही तासांत 'पेटीएम'ने पंतप्रधानांचे आभार मानत असल्याच्या जाहिराती सर्वदूर प्रसृत केल्या आणि ही डिजिटल इंडियाच्या भरारीची आणि त्याचमुळे कागदी नोटांच्या अंताची सुरुवात असल्याचे आपणास सांगितले गेले. त्यापुढच्या काळात काळा पैसा कायमचा अंतर्धान पावता पावता कागदी चलनी नोटा हद्दपार होणार, सीमेपलीकडून बनावट नोटांचा पुरवठा आटणार, परिणामी काश्मिरातील हिंसाचार संपणार असे बरेच काही होणार असल्याची द्वाही फिरवली गेली. त्यानंतरच्या काळात काय काय झाले ते भारतीयांनी अनुभवले. त्याच्या उजळणीची आणि याही मुद्द्यावर 'लोकसत्ता'चे भाष्य किती अचूक ठरले याच्या पुनरुक्तीची अजिबात गरज नाही. त्यातच, गेली काही वर्षे सरासरी १५ टक्के इतक्या मोठ्या गतीने रोख रकमेचा सुळसुळाट वाढत चालल्याचे प्रतिपादन चलन व्यवहारावर नियंत्रण असलेली रिझर्व्ह बँक करत असेल तर त्या द्रष्ट्या निर्णयाच्या यशापयशाची वेगळी चिकित्सा करण्याचे कारण नाही. तथापि नव्याने या विषयास स्पर्श करण्याचे कारण म्हणजे रिझर्व्ह बँकेचा ताजा निर्णय.

तो आहे यापुढे कागदाऐवजी प्लास्टिकच्या नोटा चलनात आणण्याचा. कागदी नोटा लवकर खराब होतात आणि त्यांच्या निर्मितीचा खर्चही अधिक आहे असे कारण रिझर्व्ह बँक या संदर्भात देते. ते खरे असेलही. त्याच वेळी देशातील एक बडा सरकारस्नेही 'अ'द्योगपती प्लास्टिक नोटांसाठी आवश्यक रसायनांच्या उत्पादनात प्रवेश करत असल्याचे आरोप काहींकडून होतात. तेही खरे असतील.

रिझर्व्ह बँकेस प्लास्टिक नोटांची गरज वाटणे आणि या 'अ'द्योगपतीच्या संभाव्य प्लास्टिक रसायनांस गिऱ्हाईक हवे असणे हे दोनही मुद्दे एकाच वेळी तितकेच सत्य असू शकतात. तशीही भारतीयांस गेल्या दहा वर्षांत अशा योगायोगांची सवय आहेच. (पाहा : सौर ऊर्जेवर केंद्राचा धोरणात्मक भर आणि त्याच वेळी काही 'अ'द्योगपतींचे या क्षेत्रात पदार्पण इत्यादी) तेव्हा हे दोनही खरे असले वा नसले तरी रिझर्व्ह बँकेकडून जो काही तपशील प्रसृत झाला त्यावरून एक बाब मात्र निश्चित निर्विवाद खरी असल्याचे स्पष्ट दिसते. ती म्हणजे नोटा वापरणाऱ्यांच्या संख्येत होत असलेली लक्षणीय वाढ. आणि त्याबरोबर नोटा छापण्याच्या खर्चात झालेली वाढ. रिझर्व्ह बँकेच्या अहवालातच याबाबतचा तपशील असून तो थक्क करणारा आहे.

रिझर्व्ह बँकेने गेल्या वर्षी केवळ नोटा छापण्यावर सुमारे पाच हजार कोटी रु. खर्च केले. तर यंदा हाच खर्च ६,३७८ कोटी इतका झाला. गेल्या वर्षी खराब झालेल्या, फाटलेल्या इत्यादी २३०० कोटी नोटा देशभर बँकेत जमा झाल्या. त्याआधीच्या वर्षात हीच संख्या २१०० कोटी इतकी होती. यातही हास्यास्पद वाटेल अशी बाब म्हणजे बँकेत बदलीसाठी आलेल्या बहुतांश नोटा या नव्या, २०१६ सालातील निश्चलनीकरणानंतर प्रसृत झालेल्या आहेत. यावरून या नोटांच्या छपाईचा, कागदाचा दर्जा काय हे ध्यानात यावे.

या सर्व तपशिलाचा अर्थ एकच. आपल्या देशात रोखीचे व्यवहार कमी होण्याचे काही नाव नाही. हे प्रमाण दरवर्षी ११.५ टक्क्यांनी वाढते असून १५ मे या एकाच दिवशी चलनात असलेल्या नोटांचे एकत्रित मूल्य ४२ लाख ८६ हजार कोटी रु. इतके आहे.

## अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरण विरोधात भव्य जनआक्रोश मोर्चा : आकाश दादा शिरसाट सम्राट अशोक सेना अध्यक्ष

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** अशोक वाटिका ते जिल्हाधिकारी कार्यालय,अकोला पर्यंत हा जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला..विषयः अनुसूचित जाती (SC) आरक्षणातील उपवर्गीकरणा विरोधात भव्य जनआक्रोश मोर्चा.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून शोषित,वंचित,पीडित आणि बहुजन समाजाला सामाजिक,शैक्षणिक व राजकीय न्याय मिळवून देण्यासाठी आरक्षणाची तरतूद केली.अनुसूचित जाती समाजाला मिळालेले आरक्षण हे संपूर्ण समाजाच्या ऐतिहासिक अन्यायाच्या परिमार्जनासाठी आणि संविधानिक प्रतिनिधित्वासाठी देण्यात आलेले संरक्षण आहे. मात्र,महाराष्ट्र शासनाकडून अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण (Sub-Categorization) करण्याच्या दिशेने सुरू असलेल्या प्रक्रियेमुळे संपूर्ण आंबेडकरी समाजामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.या प्रक्रियेमुळे अनुसूचित जाती समाजामध्ये फूट पडण्याची,सामाजिक ऐक्य कमकुवत होण्याची आणि संविधानाने दिलेल्या समान प्रतिनिधित्वाच्या अधिकारावर




आघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यासंदर्भात राज्य शासनाने माजी न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली. सदर समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला असून.त्या अहवालाच्या आधारे अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे. मात्र,समितीचा संपूर्ण अहवाल आजपर्यंत सार्वजनिक करण्यात आलेला नाही. त्यामुळे अहवालामध्ये नेमक्या कोणत्या शिफारसी करण्यात आल्या आहेत,त्याचा अनुसूचित जाती समाजावर काय परिणाम होणार आहे आणि कोणत्या आधारावर आक्षेप नोंदवावेत,याबाबत समाजामध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.विशेष म्हणजे,शासनाने या अहवालावर आक्षेप व सूचना नोंदविण्यासाठी ई-मेलद्वारे अभिप्राय मागविले होते.परंतु ही प्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जयंती (11 एप्रिल) ते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती (14 एप्रिल) या कालावधीत राबविण्यात आली. हा कालावधी संपूर्ण आंबेडकरी समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा असून विविध सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक आणि जयंती कार्यक्रमांमध्ये समाज मोठ्या प्रमाणावर व्यस्त असतो, त्यामुळे अपेक्षित प्रमाणात आक्षेप व सूचना नोंदविल्या गेल्या असतील का.? याबाबत गंभीर शंका निर्माण झाली आहे.

समितीचा अहवाल सार्वजनिक न करता आक्षेप मागविणे ही प्रक्रिया पारदर्शकता, नैसर्गिक न्याय आणि लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याची भावना समाजामध्ये निर्माण झाली आहे.

त्यामुळे समाजाचा वाढता रोष लक्षात घेता शासनाने अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रस्ताव तात्काळ रद्द करावा,अनुसूचित जाती समाजाच्या संविधानिक हक्कांवर कुठल्याही प्रकारचा आघात होणार नाही याची हमी द्यावी, अशी मागणी संपूर्ण आंबेडकरी समाजाकडून करण्यात येत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर संविधान,आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या संरक्षणासाठी आज दिनांक 03 जून 2026 रोजी अशोक वाटिका ते जिल्हाधिकारी कार्यालय,अकोला या मार्गावर भव्य जनआक्रोश मोर्चा आयोजित केला होता

या मोर्चामध्ये अकोला जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भातून आणि राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले आहेत.

जन आक्रोश मोर्चाच्या प्रमुख मागण्या

१.महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ रद्द करावी..

२.बदर समितीचा संपूर्ण अहवाल सार्वजनिक करण्यात यावा..

३.अनुसूचित जाती आरक्षणासंदर्भातील उपवर्गीकरणाची कोणतीही प्रक्रिया पुढे राबविण्यात येऊ नये..

४.आरक्षणातील सर्व रिक्त जागा आणि बॅकलॉग तातडीने भरावेत..

५.आरक्षणाची योग्य व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र उच्चस्तरीय समिती गठित करण्यात यावी.

६.कंत्राटी भरती बंद करून नियमित पदभरती प्रक्रिया राबविण्यात यावी.

७.शासकीय क्षेत्रातील खासगीकरणाला आळा घालण्यात यावा..

८.अनुसूचित जाती समाजाच्या संविधानिक हक्कांचे संरक्षण करण्यात यावे..

९.राखीव प्रवर्गातील उमेदवारांना पूर्वीप्रमाणेच मेरिट बेसवर खुल्या प्रवर्गातील जागांवर हक्क मिळण्याचा संविधानिक अधिकार कायम ठेवण्यात यावा हीच आमची मागणी नाहीतर महाराष्ट्रभर आम्ही जन आक्रोश मोर्चे मंत्रालयावर घेऊन येऊ हाच इशारा देतो या मोर्चात आम्ही सहभाग झालो आणि आरक्षण उप वर्गीकरण रद्द झालं पाहिजे अशी मागणी केली.!!

सम्राट अशोक सेना महाराष्ट्र राज्य
आकाश दादा शिरसाट
आयोजक
सर्व आंबेडकरवादी जनसमुदाय,अकोला जिल्हा.तसेच आरक्षण बचाव कृती समिती.

## हेल्पलाइन १९६२ व चॅटबॉटद्वारे पशुवैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी भाऊसाहेब सरनाईक :** गेल्या पाच वर्षांत, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड, इंडसइंड बँक व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या १९६२ या टोल-फ्री हेल्पलाइनने राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे जाळे बळकट केले आहे. 'मोबाईल व्हेटर्नरी युनिट्स' म्हणजेच फिरत्या पशुवैद्यकीय वाहनांच्या माध्यमातून या उपक्रमाने विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या दारात पशुवैद्यकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे.

आतापर्यंत ८ लाखांहून अधिक जनावरांवर उपचार करण्यात आले असून, यामुळे पशुधनाची वेळेवर, सुलभ व विश्वासार्ह काळजी घेणे शक्य झाले आहे.

या उपक्रमाच्या यशानंतर, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड (इंडसइंड बँक) व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सेवा अधिक गतिमान करण्यासाठी 'व्हॉट्सॲप-आधारित चॅटबॉट सेवा' सुरू केली आहे. या डिजिटल उपक्रमाचा उद्देश संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना सेवा मिळवणे सोपे करणे, संवाद सुलभ करणे व रिअल-टाइम (तात्काळ) पशुवैद्यकीय साहाय्य प्रदान करणे हा आहे.

व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवा

शेतकरी +91 9063142299 या क्रमांकावर संदेश (मेसेज) पाठवून किंवा निश्चित केलेला क्यूआर (QR) कोड स्कॅन करून या चॅटबॉट सेवेचा लाभ घेऊ शकतात. शेतकऱ्यांना त्यांच्या घरातूनच, व्हॉट्सॲपच्या अत्यंत सोप्या व वापरण्यास सुलभ इंटरफेसचा वापर करून जलद व सोयीस्कर पशुवैद्यकीय सल्ला आणि सेवा मिळाव्यात, अशा पद्धतीने हा चॅटबॉट डिझाइन करण्यात आला आहे.

हे कसे काम करते?

शेतकरी +91 9063142299 या क्रमांकावर व्हॉट्सॲपवर "Hi" पाठवून खालील सेवा मिळवू शकतात:

पशुधनाचे आजार, उपचार आणि लसीकरणाबाबत माहिती मिळवणे.

पशुसंवर्धन आणि सरकारी योजनांची सविस्तर माहिती मिळवणे.

खालील माध्यमांद्वारे पशुवैद्यकीय डॉक्टरांशी संपर्क साधणे:

o चॅट (Chat)

o ऑडिओ कन्सल्टेशन (व्हॉईस कॉल सल्ला)

o व्हिडिओ कन्सल्टेशन / टेलिकन्सल्टेशन (व्हिडिओ कॉल सल्ला)

प्रमुख वैशिष्ट्ये

पशुवैद्यकीय टेलिकन्सल्टेशन (दूरस्थ सल्ला) सेवा

ऑडिओ व व्हिडिओ कॉलद्वारे सल्ल्याची सोय

पशुवैद्यकीय डॉक्टरांशी थेट संवाद

रुग्णालय व पशुवैद्यकीय सेवा डिरेक्टरीची (मार्गदर्शिका) उपलब्धता

सरकारी योजनांची माहिती

वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

प्रागतिक माहिती (ऑक्टोबर २०२५ ते मे २०२६)

६१५ शेतकऱ्यांनी चॅटबॉटचा वापर करून संवाद साधला आहे.

२०१ व्हिडिओ कन्सल्टेशन (व्हिडिओ कॉलद्वारे सल्ला) यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत.

उपक्रमाची उद्दिष्टे

संपूर्ण महाराष्ट्रात पशुवैद्यकीय सेवा वितरणाची यंत्रणा बळकट करणे.

शेतकऱ्यांना वेळेवर व तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.

डिजिटल सुलभता वाढवणे आणि सेवांचा विस्तार करणे.

तात्काळ संवाद व जलद प्रतिसाद यंत्रणा सक्षम करणे.

शेतकऱ्यांना होणारे फायदे

प्रवास न करता घरबसल्या पशुवैद्यकीय सेवांची उपलब्धता.

पशुधनाच्या आरोग्याशी संबंधित आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद.

सरकारी योजना व त्यांच्या फायद्यांविषयी जागरूकतेत वाढ.

सेवा मिळवण्यासाठी लागणारा वेळ व खर्चात बचत.

पशुधनाचे आरोग्य व उत्पादकतेत सुधारणा.

## कारंजा सहाय्यक गटविकास अधिकारी कैलास घुगे यांचे सेवा निवृत्ती निमीत्ताने सेवापूर्ती उत्सव संपन्न

### आमदार श्रीमती सईताई प्रकाश पाटील डहाके यांचे सह अनेक मान्यवरांची उपस्थिती

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड :** कारंजा पंचायत समिती चे सहाय्यक गटविकास अधिकारी कैलासजी घुगे नियत वयोमानानुसार ३१ मे रोजी सेवानिवृत्त झालेत . त्यांच्या प्रदीर्घ कर्तव्यनिष्ठ व उल्लेखनिय सेवेला सन्मानीत करण्यासाठी दि २ जून रोजी संध्याकाळी शिवराय लॉन सोहळ फाटा कारंजा येथे त्यांचा सेवापूर्ती व सन्मान सोहळा पार उत्साही वातावरणात पडला .

या सन्मान सोहळ्याचे अध्यक्षस्थानी कारंजा मानोरा विधान सभा क्षेत्राच्या आमदार श्रीमती सईताई प्रकाश डहाके होत्या तर प्रमुख उपस्थितीत गट विकास अधिकारी सौ पूनम राणे ; तहसीलदार रवी महाले ; मुर्तीजापूर नगराध्यक्ष हर्षल साबळे ; जीप माजी सदस्य चंद्रकांत पाकधने ; माजी गटविकास अधिकारी पडघम साहेब ; कारंजा तालुका सरपंच संघटणेचे अध्यक्ष नितीन पाटील उपाध्ये राजेश राठोड ; भास्कर पाटील शेगीकर प्रदीप पाटील मालेगाव तालूका शिवसेना ; काळबांडे साहेब यांचे सह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते .

व्यासपीठावरील मान्यवरांचा सन्मान









आयोजन समितीने शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार श्रीमती सईताई डहाके यांनी शाल श्रीफळ पुष्पगुच्छ भेटवस्तू देवून कैलासराव घुगे व सौ ज्योती घुगे यांचा सपत्नीक सत्कार केला . त्यानंतर उपस्थित चाहते मंडळी तथा अनेक संघटनांनी त्यांच्या कार्याचा गौरव सत्कारा सह भेट वस्तू देवून केला . या वेळी व्यासपीठावरील मान्यवरांनी कैलासजी घुगे यांच्या सेवेचा गौरव आपल्या भाषणातून गौरवोदगार काढत केला . अध्यक्ष पदावरून बोलतांना आमदार सईताई डहाके म्हणाल्या की घुगे साहेबांची कर्तव्य निष्ठता उल्लेखनीय असल्याने त्यांच्या सेवेला सन्मानित करण्यासाठी आपण सर्वजन या ठीकानी उपस्थित आहोत . अनेक अधीकारी येतात व जातात मात्र घुगे साहेबाची कर्तव्यनिष्ठता स्मरणात ठेवण्याजोगी आहे . त्यांनी यापुढेही त्यांचे समान अधिकारी घडवावेत व जनसेवा करावी . कार्यक्रमाचे प्रास्तावीक रमेश मुंजे यांनी केले . कार्यक्रमाचे संचलन ग्राम पंचायत अधिकारी गजानन उपाध्ये यांनी तर आभार प्रदर्शन सौरभ घुगे यांनी केले . उपस्थीततांनी कैलासजी घुगे ज्योती घुगे यांना भेटवस्तू शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देवून सन्मानीत केले . पुरुषोतम मासात सेवा पूर्ती झाल्याने उपस्थितांना रस पुरण पोळी बुंदीचे लाडू सह सुग्रास सहभोजन देण्यात आले . सेवापूर्ती कार्यक्रमास चाहत्यांची उपस्थिती लक्षणीय होती .

## दिवा शहरातील नालेसफाई कामांबाबत मनसेची तीव्र नाराजी; तातडीने कारवाईची मागणी

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) ठाणे/दिवा :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिवा शहराचे शहराध्यक्ष श्री. तुषार भास्कर पाटील यांनी दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांना निवेदन देऊन दिवा शहरात सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दरवर्षीप्रमाणे यंदाही ३० मे पूर्वी नालेसफाईची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. मात्र, पावसाळा तोंडावर असताना देखील कामांचा वेग अत्यंत संथ असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, अल्प पावसातही शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळेल असे



मनसेने आपल्या निवेदनात म्हटले आहे.

यावर्षी नालेसफाईसाठी सुमारे १ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. एवढा मोठा खर्च करूनही कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने होत नसल्यास तो सार्वजनिक निधीचा अपव्यय आहे. दिवा प्रभाग समिती मधील प्रभाग क्रमांक २७, २८ आणि २९ मध्ये मोठा गाजावाजा करत नालेसफाईच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. संबंधित नालेसफाईच्या कंत्राटदाराला सहाय्यक आयुक्तांसमोरच फोन केला असता कंत्राटदाराने २५० कामगार नालेसफाई साठी काम करत असल्याची माहिती दिली. पण काम कुठे सुरू आहे याची माहिती विचारातच कुठलेही समाधानकारक उत्तर कंत्राटदाराला देता आले नाही. ज्या स्वच्छता निरीक्षकांनी या सर्व कामावर देखरेख ठेवायला हवी त्या स्वच्छता निरीक्षक डोंगर परदेशी यांनाही नालेसफाई नेमकी कुठे सुरू आहेत, तिथे किती कामगार काम करतात याची माहिती नव्हती. अशा पद्धतीने जर दिवा शहरात कमी होत असतील तर नालेसफाई कशा पद्धतीने होत असेल याचा विचार न केलेला बरा असे मनसेने आपल्या पत्रकात म्हटले आहे. ठाणे महापालिकेने ८०% नालेसफाई झाल्याचा दावा केलेला असताना दिव्यात मात्र सगळा सावळागोंधळ दिसून येत आहे. दिव्यात सध्या २०% ते २५% नालेसफाई झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे यावर्षी पुन्हा नागरिकांच्या घरात पाणी शिरल्यास संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांना मनसे स्टाईल धडा शिकवू असा इशारा दिवा मनसेने दिला आहे.

यावेळी दिवा शहराध्यक्ष तुषार भास्कर पाटील, शहर सचिव प्रशांत प्रभाकर गावडे, विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील, शरद पाटील, संतोष पाटील,उपविभाग अध्यक्ष, शाखा अध्यक्ष, महिला पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# ताटातील एका घासाने विचारायला भाग पाडलेला प्रश्न

महाराष्ट्र जीत

आपण दररोज जेवतो. ताटातील अन्न खातो. चव, पोषणमूल्य आणि किंमतीबद्दल बोलतो. पण आपल्या ताटात आलेल्या त्या एका घासामागे किती मोठी कथा दडलेली असते, याचा विचार आपण किती वेळा करतो?काही दिवसांपूर्वी साधे जेवण करत असताना हाच विचार माझ्या मनात आला. ताटातील भात, भाजी, डाळ आणि मसाले यांचा प्रवास माझ्यापर्यंत पोहोचण्याआधी कितीतरी टप्प्यांतून झाला होता. त्या अन्नामागे एक शेतकरी होता, ज्याला मी कदाचित कधी भेटणारही नाही. त्यामागे ती माती होती, जिला मी कधी स्पर्श केला नसेल. त्यामागे पाऊस होता, ज्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. त्यामागे असंख्य सूक्ष्मजीव, पक्षी, कीटक आणि निसर्गाच्या अदृश्य व्यवस्था होत्या, ज्या शांतपणे आपले काम करत राहिल्या.

माझे जेवण अवघ्या काही मिनिटांत संपले. पण त्या अन्नामागचा प्रवास अनेक महिन्यांचा होता.याच जाणिवेने एक अस्वस्थ करणारा प्रश्न मनात उभा राहिला — आपण अन्न खातो, पण अन्न निर्माण करणाऱ्या व्यवस्थांशी आपले नाते कितपत उरले आहे?आज आपण अन्नाच्या किमतीबद्दल बोलतो, पण मातीच्या आरोग्याबद्दल क्वचितच बोलतो. पाण्याच्या टंचाईची चर्चा करतो, पण पिकांना जीवन देणाऱ्या जलचक्राबद्दल फारसा विचार करत नाही. अन्नाच्या गुणवत्तेची चिंता करतो, पण जैवविविधता आणि परागीकरण करणाऱ्या जीवांचे महत्त्व आपल्या चर्चेतून अनेकदा गायब असते.गेल्या काही वर्षांत शेतकरी आणि ग्रामीण समुदायांशी संवाद साधताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. शेतकरी अन्नाकडे बाजारातील वस्तू म्हणून पाहत नाही; तो त्याकडे संघर्ष, परिश्रम आणि अनिश्चिततेच्या रूपात पाहतो. कार्यालयातील कर्मचारी वेळेच्या मर्यादांबद्दल चिंतित असतो. व्यापारी बाजारातील चढ-उतारांबद्दल विचार करतो. पण शेतकरी पावसाबद्दल चिंतित असतो. तो मातीबद्दल विचार करतो. तो पाण्याच्या उपलब्धतेची काळजी करतो. कारण त्याचे जीवन अजूनही निसर्गाच्या लयीत चालते.

## अन्नाच्या प्रत्येक घासामागे दडलेली पृथ्वीची कथा




शहरी समाज आणि शेती यांच्यातील अंतर केवळ भौतिक नाही; ते भावनिक आहे.आजची मुले अनेक ब्रँड्स सहज ओळखतात, पण अनेकांना पिके ओळखता येत नाहीत. मोबाईलवर अन्न मागवण्याची प्रक्रिया त्यांना माहिती असते, पण ते अन्न कोणत्या परिस्थितीत पिकवले गेले, याची कल्पना नसते. ही दरी वाढत चालली आहे.आणि हीच दरी चिंतेची बाब आहे. कारण जेव्हा माणूस एखाद्या गोष्टीच्या उगमाशी असलेले नाते गमावतो, तेव्हा त्या गोष्टीचे खरे मूल्यही त्याला समजेनासे होते.भविष्यातील पिढ्यांविषयी विचार करताना हा प्रश्न अधिक गंभीर वाटतो. आपण आपल्या मुलांना चांगले शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्तम संधी द्यायच्या स्वप्नात असतो. पण त्यांना सुपीक माती मिळेल का? स्वच्छ पाणी मिळेल का? अन्ननिर्मितीला आधार देणारी जैवविविधता टिकून राहील का? समाजाला पोसणाऱ्या नद्या जिवंत राहतील का?

हे केवळ पर्यावरणाचे प्रश्न नाहीत. हे अस्तित्वाचे प्रश्न आहेत.पर्यावरणाविषयीच्या चर्चा अनेकदा तांत्रिक भाषेत अडकतात. त्यामुळे सामान्य माणूस त्यापासून दूर जातो. पण अन्न ही अशी गोष्ट आहे जी प्रत्येकाला जोडते. आपण कोणत्याही भाषेत बोलत असू, कोणत्याही व्यवसायात असू किंवा जगाच्या कोणत्याही भागात राहत असू — प्रत्येकजण अन्नावर अवलंबून आहे. आणि प्रत्येक घास निसर्गाच्या संतुलित व्यवस्थांवर अवलंबून आहे. सत्य अत्यंत साधे आहे.सुपीक मातीची जागा कोणत्याही तंत्रज्ञानाने घेतलेली नाही. पावसाची जागा कोणत्याही यंत्राने घेतलेली नाही. जैवविविधतेची जागा कोणत्याही नवकल्पनेने घेतलेली नाही. निसर्ग हीच मानवी संस्कृतीची मूळ पायाभूत व्यवस्था आहे.तरीही आपण अनेकदा या व्यवस्था कायमस्वरूपी आहेत, असे गृहित धरतो.इतिहास मात्र वेगळी गोष्ट सांगतो. पर्यावरणीय मर्यादांकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाजांना त्याची किंमत मोजावी लागली आहे. निसर्ग संयमी असतो, पण तो प्रामाणिकही असतो. आजच्या कृतींचे परिणाम उद्या दिसतीलच असे नाही; ते अनेक वर्षांनी किंवा दशकांनंतर दिसू शकतात.माझ्या पर्यावरणीय प्रवासाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे — समाजासमोरील सर्वात मोठे आव्हान माहितीचा अभाव नाही; तर भावनिक जोडलेपणाचा अभाव आहे. माणूस ज्या गोष्टीचे मूल्य जाणतो, तिचे संरक्षण करतो. मूल्य त्यालाच वाटते ज्याला तो समजून घेतो. आणि समज त्यालाच येते ज्याचा तो अनुभव घेतो.कदाचित म्हणूनच माझे विचार पुन्हा पुन्हा ताटातील त्या साध्या जेवणाकडे परत जातात. कारण त्या एका ताटामध्ये माती, पाणी, जैवविविधता, शेतकरी, हवामान आणि ग्राहक यांना जोडणारी एक अदृश्य कथा दडलेली असते. ती कथा आपल्याला आठवण करून देते की मानव आणि निसर्ग हे वेगळे नाहीत.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने मोहिमांपेक्षा एक भावना अधिक महत्त्वाची वाटते — कृतज्ञतेची.जीवनाला आधार देणाऱ्या अदृश्य व्यवस्थांबद्दल कृतज्ञता.अनिश्चिततेतही अन्न पिकवणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल कृतज्ञता.आणि आपण घेतो त्यापेक्षा कितीतरी अधिक देणाऱ्या पृथ्वीबद्दल कृतज्ञता.

**या लेखाच्या शेवटी वाचकांच्या मनात एकच प्रश्न राहावा अशी अपेक्षा आहे —**

उद्याच्या पिढ्या जेव्हा जेवायला बसतील, तेव्हा त्या ताटातील अन्न शक्य करणारी पृथ्वी कशी असेल?या प्रश्नाचे उत्तर आज आपण घेत असलेल्या छोट्या-छोट्या निर्णयांमध्ये दडलेले आहे. अगदी आपल्या ताटातील प्रत्येक घासामागे दडलेल्या अदृश्य प्रवासाप्रमाणे.

# घरच्या घरी नैसर्गिक पद्धतीने आंबे पिकवण्याची सोपी ट्रिक

महाराष्ट्र जीत



उन्हाळा म्हटलं की रसाळ, गोड आंब्यांची आठवण येतेच. बाजारात सध्या विविध प्रकारचे आंबे मोठ्या प्रमाणात दिसत असले, तरी अनेक जण रासायनिक पद्धतीने पिकवलेल्या आंब्यांमुळे चिंतेत असतात. त्यामुळे आता अनेकांचा कल घरीच नैसर्गिक पद्धतीने आंबे पिकवण्याकडे वाढताना दिसतोय. विशेष म्हणजे यासाठी भुसा, पोते किंवा लाकडी पेटीची गरज नसते. घरात सहज उपलब्ध असणाऱ्या वस्तूंच्या मदतीनेही आंबे छान गोड आणि नैसर्गिकरित्या पिकवता येतात.

**वर्तमानपत्राच्या मदतीने पिकवा आंबे**

आंबे पिकवण्यासाठी सर्वात सोपी आणि घरगुती पद्धत म्हणजे वर्तमानपत्राचा वापर. यासाठी सर्वप्रथम एखादं पसरट भांडं, टोपलं किंवा दुरडी घ्या. त्यामध्ये खाली वर्तमानपत्राचा जाड थर पसरवा. जर आंबे जास्त असतील, तर जमिनीवर सतरंजी टाकून त्यावर वर्तमानपत्र अंथरू शकता. आता त्यावर एकेक आंबा अंतर ठेवून ठेवा. आंबे पूर्ण झाकणं महत्त्वाचं आंबे ठेवून झाल्यानंतर त्यावर पुन्हा वर्तमानपत्र घाला. आंब्यांना कुठूनही हवा लागू नये याची काळजी घ्या. एखादा भाग उघडा राहिला तर आंबे व्यवस्थित पिकत नाहीत किंवा खराब होण्याची शक्यता वाढते. यानंतर त्यावर जाडसर कापड, चादर किंवा बेडशीट झाकून ठेवा.

४ ते ५ दिवसांत सुरू होईल पिकण्याची प्रक्रिया आता हे आंबे ४ ते ५ दिवस तसेच ठेवून द्या. या काळात आंब्यांमधून नैसर्गिकरित्या इथिलीन वायू तयार होतो, ज्यामुळे ते हळूहळू पिकू लागतात. दररोज आंबे तपासत राहा आणि जे आंबे पिकलेले दिसतील ते वेगळे काढून ठेवा.

**ही काळजी नक्की घ्या.**

खराब किंवा कुजलेले आंबे इतरांमध्ये ठेवू नका.

आंबे पाण्याने धुऊन लगेच पिकत ठेवू नयेत.

खूप उष्ण जागी आंबे ठेवणे टाळा.

हवेशीर पण थेट सूर्यप्रकाश नसलेल्या जागेत आंबे ठेवा.

**नैसर्गिक पद्धतीने पिकलेले आंबे का चांगले?**

घरी नैसर्गिक पद्धतीने पिकवलेले आंबे अधिक गोड, रसाळ आणि सुरक्षित मानले जातात. रसायनांचा वापर टाळल्यामुळे त्यांच्या चवीसोबत आरोग्याचाही फायदा होतो.

# विनोद सम्राट ; पद्मश्री अशोक सराफ

महाराष्ट्र जीत

मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ विनोदी अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा, पद्मश्री अशोक सराफ यांचा आज ७९ वा वाढदिवस. विनोदाचा हा सम्राट बघता बघता ७९ वर्षाचा झाला यावर रसिकांचा विश्वास बसणे कठीण असले तरी ते सत्य आहे. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी मुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डि. जि. टी विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हम्द्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या समवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्षा या जोडीने मराठी चित्रपटसृष्टित अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली. सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा, आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या. वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली. अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून,



गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू , शुभमंगल सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे बाप ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त , संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत. हम पांच, टना टन टन, डोन्ट वरी, हो जायेगा, छोटी बडी बाते यासारख्या काही टीव्ही मालिका देखील त्यांनी केल्या. त्यांनी भूमिका केलेले हमीदा बाईची कोठी, अनधिकृत मनोमिलन, हे राम, कार्डिओग्राम, सारखं छातीत दुखतंय ही नाटकेही खूप गाजली. चित्रपट, टीव्ही, रंगमंच अशा तिन्हीं माध्यमातून त्यांनी आपल्या अभिनयाची मुशाफिरी केली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २०० हुन अधिक चित्रपटात भूमीका केल्या. रंजना, उमा भेंडे, प्रेमा किरण, निवेदिता जोशी, वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, अलका कुबल, प्रिया बेर्डे, किशोरी शहाणे या आणि अशा अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी भूमिका केल्या. विशेष म्हणजे या सर्व अभिनेत्री त्यांना सेटवर मामा म्हणत. आज तर ते संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मामा झाले आहेत. आज त्यांना अशोक मामा याच नावानेच ओळखले जाते. अशोक सराफ यांना अशोक मामा हे नाव कसे पडले हे पाहणे देखील रंजक आहे. एका चित्रपटाच्या सेटवर प्रकाश शिंदे नावाच्या कॅमेरामन सोबत त्यांची मुलगी येत असत. सेटवर आली की ती विचारत असे, हे कोण ? त्या कॅमेरामनने सांगितले हे अशोक सराफ पण तू यांना मामा म्हणायचे. त्या मुलीसोबत सेटवरील सर्वजण त्यांना मामा म्हणू लागले पुढे हेच नाव रुढ झाले आणि अशोक सराफचे अशोक मामा बनले. अशोक सराफ यांना मागीलवर्षी पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान केला. अशोक मामांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रात आनंदोत्सव साजरा करण्यात आला होता. जगभरातील मराठी माणसांनी त्यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या होत्या. अशोक मामांना अभिनयासाठी मिळालेला हा पहिला पुरस्कार नाही. याआधीही त्यांच्या अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत मात्र ते नेहमी म्हणतात की प्रेक्षकांच्या मनात मी स्थान निर्माण करू शकलो हाच माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे आणि ते सत्यही आहे. अशोक सराफ यांच्यावर मराठी प्रेक्षकांनी जितके प्रेम केले तितके कोणत्याच अभिनेत्यावर केले नसेल. जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण करून प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या या विनोदाच्या अभिनय सम्राटाला ७९ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा अशोक मामा!!!

**श्याम ठाणेदार**

# आयुर्वेदानुसार किती तासांची झोप आवश्यक? घ्या जाणून.....

महाराष्ट्र जीत

आजकाल जवळजवळ प्रत्येकाचे झोपेचे चक्र लक्षणीयरीत्या विस्कळीत झाले आहे. रात्री उशिरापर्यंत काम करणे, फोन सतत स्क्रोल करीत राहणे, रात्री उशिरापर्यंत जागणे या चुकीच्या सवयींमुळे झोपेचे चक्र पूर्णपणे बिघडले आहे. काही लोक सकाळी लवकर उठतात; पण रात्री उशिरा झोपतात. परिणामी, जेमतेम



पाच-सहा तासांची झोप घेणे हे दिवसेंदिवस सामान्य होत चालले आहे. आरोग्यदायी जीवनशैलीत झोपेचे महत्त्व आपल्या सर्वांनाच माहीत आहे. तरीही संभ्रमामुळे काही लोकांना पाच-सहा तासांची झोप पुरेशी वाटते; तर काहीना ८-१० तासांची झोप हवीहवीशी वाटते. आता प्रश्न असा आहे की, खरोखर किती तासांची झोप सर्वोत्तम आहे? यावर आयुर्वेद काय सांगतो? त्याबद्दल आज आपण जाणून घेऊ...

**आयुर्वेदानुसार किती तासांची झोप आवश्यक?**

जर तुम्ही सहा तासांपेक्षा कमी झोपत असाल, तर तुम्हाला काहीतरी अंतर्निहित समस्या असू शकते. मात्र, जर तुम्ही आठ तासांपेक्षा जास्त झोपत असाल, त ते एखाद्या अंतर्निहित समस्येचे लक्षण असू शकते. एकूणच, आयुर्वेद किमान सहा तास आणि कमाल आठ तास झोपेची शिफारस करतो. जर तुम्हाला इतकी झोप मिळत असेल, तर ती तुमच्या शरीरासाठी पुरेशी आहे. तुम्ही तुमची दैनंदिन दिनचर्या आणि गरजा यांनुसार तुमच्या झोपेच्या वेळा समायोजित करू शकता.

**गाढ आणि चांगली झोप घेणे महत्त्वाचे**

केवळ किमान तास झोप घेतली जातेय का हे पाहणेच पुरेसे नाही, तर झोपेची गुणवत्ता त्यापेक्षा अधिक महत्त्वाची आहे.आयुर्वेद आणि इतर धर्मग्रंथांनुसार, योग्य वेळी गाढ झोप घेणारी व्यक्ती आनंदी, सुदृढ, तल्लख अन् बलवान असते. अशा व्यक्तीमध्ये वाढलेली जीवनशक्ती, तेज, ज्ञान आणि दीर्घायुष्य अशा गोष्टी असल्याची प्रचिती आपल्याला येते.

रात्री १० ते पहाटे ४ च्या दरम्यान झोपणे तुमच्या शरीरासाठी सर्वांत फायदेशीर आहे. ब्रह्म मुहूर्तावर पहाटे ४ वाजता उठून आपल्या दिवसाची सुरुवात करा. जर तुम्ही एक तास उशिरा म्हणजे रात्री ११ वाजता झोपायला गेलात, तर तुम्ही पहाटे ५ वाजता उठू शकता. या वेळेत अर्ध्या तासाचा बदल होऊ शकतो; परंतु त्यापेक्षा उशिरा उठणे टाळा.

**झोपण्याची योग्य पद्धत कोणती?**

आयुर्वेदानुसार, गाढ आणि चांगली झोप लागण्यासाठी तुम्ही हात आणि पाय सरळ ठेवून झोपले पाहिजे. तुम्ही कुशीवर झोपू शकता; पण तुमचे हात आणि पाय नेहमी सरळ ठेवा. त्याशिवाय तुमची उशी खूप जाड असणार नाही याची काळजी घ्या.

# एआयमुळे शिक्षकांची भूमिका संपणार नाही, तर अधिक सक्षम होणार!

महाराष्ट्र जीत

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) शिक्षण क्षेत्रात झपाट्याने प्रवेश करत असताना अनेकांच्या मनात एक प्रश्न निर्माण होत आहे – एआयमुळे शिक्षकांची गरज कमी होईल का? तज्ज्ञांचे मत मात्र याच्या उलट आहे. एआय शिक्षकांची जागा घेणार नाही, तर त्यांचा प्रभावी सहकारी किंवा ‘जोडीदार’ म्हणून काम करणार आहे.

आज शिक्षकांचा मोठा वेळ चाचण्या तपासणे, अभ्यासक्रमाचे नियोजन करणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण करणे आणि शैक्षणिक साहित्य तयार करण्यात खर्च होतो. एआय ही अनेक नियमित आणि वेळखाऊ कामे अधिक वेगाने आणि अचूकपणे करू शकतो. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांशी अधिक संवाद साधण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेळ देता येईल.

भविष्यात शिक्षणाचा केंद्रबिंदू केवळ पाठ्यपुस्तकांपुरता मर्यादित राहणार नाही. विद्यार्थ्यांची विचारशक्ती, सर्जनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता, भावनिक बुद्धिमत्ता आणि व्यक्तिमत्त्व विकास यावर अधिक भर दिला जाईल. या बाबतीत एआय कितीही प्रगत झाला तरी मानवी शिक्षकांची भूमिका महत्त्वाचीच राहणार आहे. विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे, नैतिक मूल्ये रुजवणे आणि योग्य मार्गदर्शन करणे ही जबाबदारी तंत्रज्ञान पूर्णपणे पार पाडू शकत नाही.

मात्र, शिक्षण क्षेत्रात वाढत्या तांत्रिक वापरासोबत शिक्षकांच्या जबाबदाऱ्याही वाढत आहेत. अलीकडच्या काही घटनांमुळे शिक्षकांच्या वर्तन, नैतिकता आणि उत्तरदायित्वाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. NEET परीक्षेच्या संदर्भात समोर आलेल्या गैरप्रकारांमुळे शिक्षण व्यवस्थेतील काही त्रुटी अधोरेखित झाल्या. अशा घटनांमुळे सर्व शिक्षकांवर संशय घेणे योग्य नाही, परंतु पारदर्शकता आणि जबाबदारीची यंत्रणा अधिक मजबूत करण्याची गरज निश्चितच आहे. “प्रत्येक शिक्षक संशयाच्या भोवऱ्यात आहे” असे म्हणणे अन्यायकारक ठरेल. मात्र, शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक असल्याने त्याच्याकडून अधिक उच्च नैतिकतेची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर जितका वाढेल तितकी मानवी मूल्यांची जपणूकही महत्त्वाची ठरणार आहे.

एआय आणि शिक्षक यांच्यात स्पर्धा नसून सहकार्याचे नाते निर्माण होण्याची शक्यता अधिक आहे. तंत्रज्ञान नियमित कामे सांभाळेल, तर शिक्षक विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकासावर लक्ष केंद्रित करतील. त्यामुळे भविष्यातील




शिक्षण अधिक प्रभावी, वैयक्तिक आणि गुणवत्तापूर्ण होण्याची अपेक्षा आहे.एखाद्या खेड्यातला विद्यार्थी रात्री उशिरा अभ्यास करत बसला आहे. गणितातील एक अवघड उदाहरण त्याला काही केल्या समजत नाहीये. घरात शिकवायला कोणी नाहीये, ट्युशनची सोयही त्या खेडेगावात नाहीये. पण अशातही, तो मोबाईल उघडतो आणि कुठल्याही एका AI-आधारित शिक्षण ॲपला तो प्रश्न विचारतो. काही सेकंदांत उत्तर समोर येतं. फक्त उत्तरच नाही, तर अगदी टप्प्याटप्प्याने समजावून सांगितलेलं स्पष्टीकरणही, त्याच्या चुका दाखवणारी नोंद आणि त्याच्या पातळीला साजेसं आणखी सरावाचं मार्गदर्शन सुद्धा…

काही वर्षांपूर्वी ही गोष्ट काल्पनिक वाटली असती. पण आज हे घडते आहे..

आज कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच AI शिक्षणाच्या जगात शांतपणे प्रवेश करत आहे आणि त्यामुळे एक असाही प्रश्न समोर येतो आहे तो म्हणजे भविष्यात वर्गात शिक्षक माणूस असेल की मशीन?

शिक्षण ही केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नाही; ती माणूस घडवण्याची प्रक्रिया आहे. शिक्षक फक्त धडा शिकवत नाही, तर विद्यार्थ्याचा आत्मविश्वास वाढवतो, त्याला प्रेरणा देतो, त्याच्या भीतीही समजून घेतो. पण दुसऱ्या बाजूला वास्तवही हे आहे की प्रत्येक विद्यार्थ्याला समान दर्जाचं शिक्षण मिळत नाही. शहर आणि गाव, श्रीमंत आणि गरीब, इंग्रजी आणि प्रादेशिक माध्यम या सगळ्यांमध्ये मोठी दरी आहे. याच ठिकाणी AI शिक्षणासाठी मोठी संधी म्हणून समोर येत आहे.

AI-आधारित शिक्षण प्रणालींची सर्वात मोठी ताकद म्हणजे Personalised Learning. म्हणजेच प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार शिक्षण. एका वर्गात 60 विद्यार्थी असतात. प्रत्येकाची समजण्याची गती वेगळी असते. काहींना गणित पटकन समजतं, काहींना भाषा, तर काही विद्यार्थ्यांना हेच समजण्यासाठी अधिक वेळ आणि वेगळ्या पद्धतीची गरज असते. पण पारंपरिक शिक्षण पद्धतीत शिक्षकाला सगळ्यांना एकाच गतीने शिकवावं लागतं.

AI मात्र प्रत्येक विद्यार्थ्याचं स्वतंत्र विश्लेषण करू शकतो. कोणत्या विषयात तो कमजोर आहे, कोणत्या प्रकारचं स्पष्टीकरण त्याला जास्त समजतं, त्याचा अभ्यासाचा वेळ काय आहे, हे सगळं AI लक्षात ठेवतो. म्हणजेच, भविष्यात प्रत्येक विद्यार्थ्याला जणू वैयक्तिक शिक्षक मिळू शकतो.

आज जगभरात अनेक शैक्षणिक प्लॅटफॉर्म AI चा वापर करत आहेत. काही प्रणाली विद्यार्थ्यांच्या चुका पाहून पुढचा अभ्यासक्रम ठरवतात. काही AI Tutors विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न सोडवतात. भाषा शिकताना उच्चार सुधारण्यापासून ते विज्ञानातील अवघड संकल्पना ॲनिमेशनद्वारे समजावून सांगण्यापर्यंत AI चा वापर वाढत आहे.

भारतातही ही बदलाची चाहूल दिसू लागली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी AI-आधारित ॲप्स आणि डिजिटल क्लासरूम्स वापरले जात आहेत. अनेक खेड्यातील विद्यार्थ्यांसाठी हे तंत्रज्ञान शहरातील शिक्षण त्यांच्या हातात आणत आहे.

पण इथे एक असाही महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो की AI हा शिक्षक असू शकतो का?

कारण शिक्षणात केवळ माहिती महत्त्वाची नसते म्हणा. भावना, प्रेरणा आणि माणुसकीही तितकीच महत्त्वाची असते. एखादा विद्यार्थी निराश असेल, घाबरलेला असेल किंवा आत्मविश्वास हरवलेला असेल तर शिक्षक त्याच्या डोळ्यातील भावना ओळखू शकतो. AI उत्तर देऊ शकतो, पण तो विद्यार्थ्याच्या मनातली भीती समजू शकतो का?

याच ठिकाणी माणूस आणि मशीन यांच्यातील फरक स्पष्ट होतो. AI कितीही प्रगत झाला, तरी त्याच्याकडे अनुभवातून आलेली मानवी संवेदनशीलता नाही. शिक्षक विद्यार्थ्याला फक्त अभ्यास शिकवत नाही; तो त्याला आयुष्य समजावतो. एखाद्या छोट्या कौतुकामुळे विद्यार्थी आयुष्यभरासाठी प्रेरित होऊ शकतो आणि ही गोष्ट कोणत्याही अल्गोरिदममध्ये मोजता येत नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे AI मुळे शिक्षकांची भूमिका कमी होईल असं अजिबात नाही, उलट ती अधिक महत्त्वाची होऊ शकते. भविष्यात शिक्षकांचा वेळ केवळ पाठ्यपुस्तक शिकवण्यात न जाता विद्यार्थ्यांच्या विचारशक्ती, सर्जनशीलता आणि व्यक्तिमत्त्व विकासावर खर्च होऊ शकतो. नियमित चाचण्या तपासणं, प्रगती विश्लेषण किंवा अभ्यास सामुग्री तयार करणं ही कामं AI करू शकतो आणि शिक्षक अधिक मानवी भूमिका निभावू शकतो. मात्र AI शिक्षणात येताना काही धोकेही आहेत. सर्व विद्यार्थ्यांकडे समान डिजिटल सुविधा नाहीत. इंटरनेट, स्मार्टफोन किंवा संगणक नसलेल्या विद्यार्थ्यांचं काय? जर शिक्षण पूर्णपणे डिजिटल झालं, तर सामाजिक दरी आणखी वाढेल का?

तसंच, विद्यार्थ्यांचा डेटा सुरक्षित राहील का, हाही मोठा प्रश्न आहे. AI विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सवयी, कमजोरी आणि वैयक्तिक माहिती गोळा करतो. हा डेटा चुकीच्या हातात गेला, तर त्याचा गैरवापरसुद्धा होऊ शकतो.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अवलंबित्व. जर विद्यार्थी प्रत्येक प्रश्नासाठी AI वर अवलंबून राहू लागले, तर त्यांची स्वत: विचार करण्याची क्षमता कमी होईल का? कारण शिक्षणाचा खरा उद्देश उत्तर मिळवणं नसून प्रश्न विचारण्याची क्षमता निर्माण करणं हा आहे.

भविष्यातील वर्गखोली कदाचित आजसारखी नसेल. बोर्ड, खडू आणि पुस्तकांसोबत AI-आधारित सहाय्यक असतील. विद्यार्थ्यांच्या शिकण्याची गती रिअल-टाइममध्ये समजणाऱ्या प्रणाली असतील. एखादा विद्यार्थी मागे पडत असेल, तर AI लगेच शिक्षकाला सूचना देईल. शिक्षण अधिक वैयक्तिक, अधिक संवादात्मक आणि अधिक सुलभ होईल.

पण या सगळ्या बदलांमध्ये एक गोष्ट कायम राहील ती म्हणजे माणसाची गरज. कारण शिक्षण म्हणजे केवळ माहितीची देवाणघेवाण नाही; ती भावनांची, प्रेरणेची आणि विश्वासाची प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रश्न असा नाही की भविष्यात वर्गात शिकवण्यासाठी माणूस असेल की मशीन. तर खरा प्रश्न असा आहे की माणूस-मशीन मिळून शिक्षण अधिक सुंदर, अधिक समतोल आणि अधिक मानवी कसं बनवतील? कारण AI विद्यार्थ्याला उत्तर देऊ शकतो पण स्वप्न पाहायला शिकवण्याची ताकद अजूनही शिक्षकाकडेच आहे.. हे तेवढेच खरे!

# ५ जून जागतिक पर्यावरण दिनाची यंदाची थीम, महत्त्व

महाराष्ट्र जीत

दरवर्षी ५ जून रोजी जगभरात पर्यावरण दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ झाडे लावण्याचा किंवा पर्यावरणाबद्दल सोशल मीडियावर पोस्ट करण्याचा नसून, पृथ्वीच्या अस्तित्वाशी जोडलेली आपली जबाबदारी ओळखून देणारा दिवस आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, जंगलतोड, प्लास्टिक प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधनांचा होत असलेला ऱ्हास पाहता पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज बनली आहे.



### पर्यावरण दिनाची सुरुवात

संयुक्त राष्ट्रसंघाने १९७२ मध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी ५ जून हा दिवस पर्यावरण दिन म्हणून घोषित केला. १९७३ पासून हा दिवस जगभर साजरा केला जात आहे. आज तो पर्यावरणाविषयी जनजागृती करणारा जगातील सर्वात मोठा उपक्रम मानला जातो.

### यंदाची थीम काय आहे?

यंदाचा जागतिक पर्यावरण दिन हवामान बदल आणि हवामान कृती (Climate Action) या महत्त्वाच्या विषयावर लक्ष केंद्रित करतो. पृथ्वी आपल्याला वारंवार इशारे देत आहे आणि आता कृती करण्याची वेळ आली आहे, “पृथ्वी देत असलेल्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करू नका” असा संदेश या वर्षाच्या मोहिमेतून देण्यात आला आहे.

### पर्यावरण दिन का महत्त्वाचा आहे?

पृथ्वीच्या संरक्षणासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देतो.हवामान बदलाच्या परिणामांबाबत जागरूकता निर्माण करतो.झाडे, पाणी आणि जैवविविधतेचे महत्त्व अधोरेखित करतो.पुढील पिढ्यांसाठी शाश्वत भविष्य घडवण्याचा संदेश देतो. पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्यास प्रेरित करतो.

### आपण काय करू शकतो?

•दैनंदिन जीवनात काही साधे बदल करा.

•तुमचे वाहन चालवण्याऐवजी शक्य असल्यास पायी चालणे सुरू करा.

•सायकल चालवणे किंवा तुमच्या रोजच्या प्रवासासाठी सार्वजनिक वाहतूक सुरू करा.

•घाण पसरवणे किंवा रस्त्यावर थुंकणे टाळा.

•तुमचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सामुदायिक मोहिमांमध्ये सहभागी व्हा.

•प्लॅस्टिकच्या बाटल्या किंवा प्लॅस्टिकची कोणतीही वस्तू वापरणे टाळा.

•घरा बाहेर पडल्यानंतर दिवे, पंखे बंद करा आणि वीज वाचवा.

•हिवाळ्यात हीटर वापरणे टाळा आणि त्याऐवजी उबदार कपडे घाला.

•प्लॅस्टिकच्या पिशव्यांवर अवलंबून न खरेदीला जाताना स्वत:ची कापडी पिशवी सोबत ठेवा.

•वापरात नसताना नळ चालू न ठेवून पाण्याची बचत करा.

•शॉवर वापरण्याऐवजी बादलीत पाणी भरून आंघोळ सुरू करा.

•तुमच्या परिसरात झाडांची लागवड, संगोपन आणि संरक्षण करण्यासाठी मदत करा.

•वापरलेल्या जुन्या इलेक्ट्रॉनिक वस्तू अशाच कचऱ्यात न टाकता रिसायकलिंगसाठी द्या.

या सगळ्या सवयी लावणं सुरुवातीला कठीण वाटतं, पण एकदा सुरुवात केलीत,

तर ते तुमच्या सवयीचा भाग बनतात.

# ठाणे जिल्ह्यात “माझं गाव – आरोग्य संपन्न गाव” अभियानाला गती

## सर्व 427 ग्रामपंचायतींचा उत्स्फूर्त सहभाग, आरोग्यविषयक विविध उपक्रमांचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**ठाणे :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी “माझं गाव - आरोग्य संपन्न गाव” अभियानाला ठाणे जिल्ह्यात अत्यंत उत्साही आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या थेट अधिपत्याखाली जिल्हाभरात विविध आरोग्यविषयक उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहेत. ग्रामस्तरावरील जनसहभागातून गावागावांमध्ये आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी प्रशासनाकडून सध्या व्यापक प्रयत्न करण्यात येत असून, विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.

या अभियानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ठाणे जिल्ह्यातील सर्वच्या सर्व ४२७ ग्रामपंचायतींनी या अभियानासाठी आपली नोंदणी पूर्ण केली असून ग्रामपंचायत स्तरावर नागरिकांचा याला प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. अभियानाच्या जिल्ह्यातील प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले असून, आजअखेर तालुका स्तरावर ५ मोठे मेळावे, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर ३३ मेळावे तसेच उपकेंद्र स्तरावर तब्बल १७५ मेळावे यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले आहेत. या आयोजित मेळाव्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, आजारांचे अचूक निदान आणि उपचार केले जात असून, शासनाच्या विविध आरोग्यविषयक कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती देऊन मोठ्या प्रमाणावर आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करण्यात येत आहे.शासन निर्णयानुसार हे अभियान सातत्याने पुढे नेण्यात येणार असून, चालू माहे जून २०२६ मध्ये अभियानांतर्गत


जिल्हाभरात अनेक महत्त्वपूर्ण आणि आरोग्याभिमुख उपक्रम राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने तालुका आरोग्य संपन्न गाव कृती दल समितीच्या बैठकांचे आयोजन करणे तसेच ग्रामपंचायत स्तरावरील आरोग्य संपन्न गाव कृती दल समितीच्या बैठका नियमितपणे घेऊन स्थानिक पातळीवर आरोग्याचा कृती आराखडा तयार केला जाणार आहे.या मोहिमेत भावी पिढीच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्यात आले असून, शाळा व अंगणवाडीतील लहान मुलांना वैयक्तिक स्वच्छता आणि सकस व सकस आहाराचे महत्त्व अतिशय सोप्या भाषेत पटवून दिले जाईल. त्याचप्रमाणे किशोरवयीन मुलामुलींसाठी वैयक्तिक स्वच्छता, जीवन कौशल्य प्रशिक्षण, विशेष वैद्यकीय शिबिरे व किशोरवयीन आरोग्य दिन यांसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

येत्या दि. १० ते १६ जून या कालावधीत संपूर्ण ठाणे जिल्ह्यात नेत्ररोगांमधे वाढती समस्या लक्षात घेता नेत्ररोगांबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून नागरिकांच्या डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल.पर्यावरण आणि आरोग्याची सांगड घालत या अभियानांतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण कार्यक्रम राबविले जातील. तसेच निरोगी जीवनशैलीसाठी योगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी विशेष जनजागृती केली जाणार असून, दररोज किमान १०० नागरिकांना तज्ज्ञांमार्फत योगाचे शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जून महिना हा कीटकजन्य आजार प्रतिबंध महिना म्हणून पाळला जात असल्याने, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया यांसारख्या घातक कीटकजन्य आजारांची लक्षणे आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्यात येणार आहे. यासोबतच सार्वजनिक स्वच्छतेचा भाग म्हणून घरातील कचऱ्याचे वर्गीकरण आणि त्याचे योग्य संकलन कसे करावे, याबाबतही घरोघरी जाऊन जनजागृती केली जाणार आहे. जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग, स्थानिक ग्रामपंचायती, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच विविध शासकीय विभागांच्या उत्कृष्ट समन्वयातून हे अभियान जिल्ह्यात अत्यंत प्रभावीपणे तळागाळापर्यंत राबविण्यात येत आहे.

# भिवंडीचे नारपोली पोलीस ठाणे बॉम्बने उडवण्याचा कट उधळला, यूपीच्या एटीएस पथकाने केलेल्या कारवाईत खळबळजनक माहिती

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके) :** वांद्रे रेल्वे स्थानकाजवळील झोपडय़ा तोडताना बेकायदा मशीदही उद्ध्वस्त करण्यात आली होती. त्याचा बदला म्हणून भिवंडीतील नारपोली पोलीस ठाणे बॉम्बने उडवण्याचा कट आखण्यात आला होता. मात्र हा कट उधळला गेला आहे.उत्तर प्रदेशातील एटीएसच्या पथकाने केलेल्या कारवाईत दोघांच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्या तपासात ही खळबळजनक



माहिती उघडकीस आली आहे.

उत्तर प्रदेशमधील एटीएसच्या पथकाने दानिलाल अशरफ व कृष्णा मिश्रा यांना ताब्यात घेतले होते. त्यांची कसून चौकशी केली असता,अनेक स्फोटक माहिती समोर आली आहे. अशरफ याने तर नारपोली पोलीस ठाण्याचे फोटो व त्याजवळील मेट्रो पुलाचा 18 सेकंदाचा व्हिडीओ तयार करून पाकिस्तानातील हँडलर्सना पाठवल्याचा आरोप आहे. त्याशिवाय नारपोली पोलीस ठाणे व त्याच्या सुरक्षा व्यवस्थेची संवेदनशील माहिती गोळा करण्याची कामगिरीही त्याच्यावर सोपवण्यात आली होती.

**प्रवेशद्वाराजवळ कडक सुरक्षा**

एटीएसच्या कारवाईतील धक्कादायक माहिती समजल्यानंतर तातडीने नारपोली पोलीस ठाण्याची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. मुख्य प्रवेशद्वारासमोरच गोण्यांची थप्पी लावून संरक्षक भिंत उभारण्यात आली असून येथे 24 तास सशस्त्र पोलीस व अतिरिक्त पोलीस कर्मचारी तैनात केले आहेत. त्याशिवाय पोलीस ठाण्यात येणाऱ्या व जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर बारकाईने लक्ष ठेवले असून परिसरातील गस्तही वाढवण्यात आली आहे.

**तरुणांना पैशांचे आमिष दाखवून रेकी**

उत्तर प्रदेशातील एटीएस पथकाने ताब्यात घेतलेल्या दोघांचे नेटवर्क थेट भिवंडीच्या नारपोली पोलीस ठाण्यापर्यंत कसे काय पोहोचले याचा तपास केला जात आहे. या नेटवर्कचे कथित संबंध ‘तेहरिक-ए-तालिबान हिंदुस्थान’ आणि शहजाद भट्टी याच्याशी असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून काही तरुणांना पैशांचे आमीष दाखवून संवेदनशील ठिकाणांची रेकी केली जात असल्याची माहितीही तपासात समोर आली आहे.